| **Publication** – Panchvati Express | **Page No** - 04 |
| --- | --- |

# रबर प्रदर्शनाचे आयोजन

**नाशिक :** इंडिया रबर एक्सपो (आयआरइ) हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे, २००१मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हा पासून तो आज रबर उद्योगातील सर्वात जास्त अपेक्षित कार्यक्रमांपैकी एक आहे. आता १०वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बाँबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून ते विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. या आघाडीच्या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशन या १९४५ मध्ये स्थापना झालेल्या देशातील सर्वात जुन्या प्रिमियर इंडस्ट्रिज असोसिएशनमार्फत होणार आहे. ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशनची स्थापना भारतीय रबर उद्योगाचे संरक्षण करणे आणि त्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने झाली होती, आज ही संस्था १२००+ सक्रिय सभासदांसोबत विस्तीर्ण संबंधासोबत उद्योगाचा आवाज बनली आहे.

इंडिया रबर एक्सपो २०१९ आंतरराष्ट्रीय मानकांना पूर्ण करण्याकडे, जगभरातील औद्योगिकव्यावसायिकांचे इंडिया रबर एक्सपो, मुंबई येथे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांची भेट घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत सहयोग करण्यासाठी आगळावेगळा मंच मिळत आहे. विकसित होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसर्‍या सर्वात जलद गतीने प्रगती करणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे. आयआरइ रबर उद्योगातल्या अत्याधुनिक तांत्रिक प्रगतींचे प्रदर्शन करेल आणि आरँएँडडी व दर्जा नियंत्रणाच्या बाजारपेठेतील सद्य स्थिती, सुविधा आणि सेवांबद्दल माहिती देणार आहे. रबर उद्योगासंबंधीच्या शासनाच्या बदलत्या नियमांबद्दल आणि नियंत्रणाबद्दल सूचना मिळत राहण्याची ही एक चांगली संधी असेल.

आयआरइ भारतातील १५ शहरांमध्ये इंडिया रबर एक्सपो २०१९ला प्रोत्साहन देण्यासाठी रोड शोचे आयोजन करत आहे. हा रोड शो अहमदाबादपासून सुरु होऊन देशातील १५ शहरांमध्ये फिरुन जागरुकता निर्माण करणारे आहे आणि इंडिया रबर एक्सपो २०१९ मध्ये अधिकाधिकलोकांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणार आहे. हा रोड शो एका मंचावर औद्योगिक व्यावसायिकांना एकत्र आणण्याचा एक उत्तम मार्ग आहे जिथे ते नवनवीन समाधानांसह येऊन नवीन व्यवसाय संधी शोधू शकतील आणि बदलत्या बाजारपेठ ट्रेंड्सबद्दल बोलू शकतील.

**मुंबई मध्ये जानेवारी २०१९ मध्ये होणार एक च ठिकाणी अंदाजे ३०० प्रदर्शकांचे इंडिया रबर एक्सपो**

**इंडियन रबर एक्सपोबद्दल**

इंडिया रबर एक्सपो हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे. २००१मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हा पासून तो आज भारतातील रबर उद्योगाला अपूर्व संधी मिळवून देणाऱ्या कार्यक्रमांपैकी एक आहे. आता १०वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बाँबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून तो विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. आयआरइ भारतीय कंपन्यांना परदेशी कंपन्यांसोबत भेट घेण्याची आणि सहयोग करण्याची आगळीवेगळी संधी देत आहे. विकसीत होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसऱ्या सर्वात जलद गतीने भरभराट होणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे. आपल्या स्थापनेपासून एकदशकाहून जास्त काळ प्रगती करणारा इंडिया रबर एक्सपो २००१मधल्या केवळ ३००० चौरस मीटरवरुन २०१९मध्ये २६००० चौरस मीटर एवढ्या भव्यतेपर्यंत वाढला आहे.